महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ७३ वे दिनांक : ०६/०३/२०२६ वार : शुक्रवार

## महाराष्ट्रात धर्मांतर विरोधी विधेयकाला मंजुरी : मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे नितेश राणे यांच्याकडून स्वागत



**मुंबई :** आज महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने धर्मांतर विरोधी विधेयकाला मंजुरी देऊन एक अत्यंत महत्त्वपूर्ण कायदेशीर पाऊल उचलले असून, भाजप आमदार व मंत्री नितेश राणे यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. विधानभवनाबाहेर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी या निर्णयाचे स्वागत करताना म्हटले की, हा राज्यासाठी ऐतिहासिक दिवस आहे.

नितेश राणे म्हणाले, आमच्या देवा भाऊंच्या महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांचा आणि विविध संघटनांचा संघर्ष आता फळाला आला आहे. हा नवीन कायदा केवळ मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या राज्यांमधील कायद्यांसारखाच नाही तर काही बाबतीत अधिक कठोर आणि प्रभावी आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर महाराष्ट्रात धर्मांतराला जबरदस्ती करण्याचा किंवा प्रवृत्त करण्याचा कोणताही प्रयत्न हा अजामीनपात्र गुन्हा मानला जाईल. जबाबदार असलेल्यांना ताबडतोब अटक केली जाईल, असे राणे म्हणाले.

नितेश राणे यांनी विधेयकातील तरतुदींवर स्पष्ट करताना म्हटले की, ख्रिश्चन मिशनरी आणि इतर गटांवर आर्थिक मदत, आरोग्यसेवा किंवा शिक्षणाच्या नावाखाली सामूहिक धर्मांतराचे आरोप अनेकदा केले जातात. या कायद्यामुळे आता अशा कारवायांना आळा बसेल. कायदा 'घर वापसी'साठी विशेष तरतुदी आणि मार्ग देखील प्रदान करतो. जेणेकरून स्वेच्छेने त्यांच्या मूळ हिंदू धर्मात परतणाऱ्यांना पूर्ण सरकारी पाठिंबा आणि संरक्षण मिळू शकेल.

हा कायदा आपल्या माता-भगिनींच्या फसवणुकी आणि धर्मांतरापासून संरक्षण करेल, असे नितेश राणे म्हणाले. ते म्हणाले, आता महाराष्ट्रात कोणीही धर्मांतर करण्याचे धाडस करणार नाही. घटनात्मक वैधतेच्या प्रश्नाबाबत त्यांनी स्पष्ट केले की मंत्रिमंडळाने यावर सखोल चर्चा केली आहे आणि हा कायदा पूर्णपणे घटनात्मक चौकटीत आहे, ज्याला सर्वोच्च न्यायालयाचाही पाठिंबा आहे, अशी माहिती राणे यांनी दिली.

## ज्योती वाघमारेंना कामामुळे राज्यसभेची उमेदवारी - एकनाथ शिंदे



**मुंबई :**"शिवसेना हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांनी नेहमीच सामान्य कार्यकर्त्यांना मोठे केले. तोच वारसा पुढे चालवत आम्ही सोलापूरच्या एका अतिशय सामान्य कुटुंबातील डॉ. ज्योती वाघमारे या 'लाडक्या बहिणीला' राज्यसभेची संधी दिली आहे," असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ज्योती वाघमारे यांची निवड ही प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रत्येक शिवसैनिकाचा सन्मान असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच शरद पवार यांच्या विनंतीमुळे ही निवडणूक बिनविरोध करण्याचा निर्णय घेतल्याचेही शिंदे म्हणाले.

ज्योती वाघमारे यांच्या निवडीबाबत अधिक माहिती देताना एकनाथ शिंदे म्हणाले की, ज्योती वाघमारे यांचे कुटुंब सोलापूरमध्ये एका कच्च्या घरात राहते. त्यांनी कधीही पदाची मागणी केली नव्हती किंवा राज्यसभेचा विषयही काढला नव्हता. "आम्ही त्यांच्यासाठी हा अनपेक्षित निर्णय घेतला आहे. ज्या कार्यकर्त्यांची नाळ जमिनीशी जोडलेली असते, त्याची नोंद पक्ष नक्कीच घेतो, हा संदेश या निवडीतून संपूर्ण महाराष्ट्रात गेला आहे. त्या संसदेत राज्याचे आणि सर्वसामान्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडतील, असा विश्वास मला आहे," असे शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील प्रश्न, देशातील प्रश्न, काही धोरणात्मक प्रश्न तसेच सर्वसामान्यांच्या हिताचे प्रश्नांना राज्यसभेत प्राधान्य देतील. शिवसेनेने केलेली निवड अतिशय सार्थक ठरेल, याचा मला विश्वास आहे. सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे काम, अतिशय सर्वसामान्य घरातील आमची ही लाडकी बहीण करेल, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

राज्यसभेसाठी शिवसेनेकडून दुसरा उमेदवार देण्याबाबत चर्चा सुरू होती. त्यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे म्हणाले, "लोकमान्य टिळकांचे पणतू डॉ. रोहित टिळक यांच्या नावाचा आम्ही विचार केला होता. मात्र, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलेली विनंती आणि त्यांचे राज्यासाठी व देशासाठी असलेले योगदान मोठे आहे. त्यांच्या ज्येष्ठत्वाचा मान राखून ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी आमची सर्वांची भावना होती. त्यामुळे आम्ही सातवी जागा न लढवण्याचा निर्णय घेतला." रोहित टिळक हे यापुढेही शिवसेनेसोबत राहून जनसेवा करतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या साडेतीन वर्षांपासून आमचे सरकार सर्वसामान्यांना बळ देण्याचे काम करत आहे. "शिवसेनेत अनेक दिग्गज इच्छुक होते, तरीही एका सामान्य घरातील महिलेची निवड केल्याने कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे. जे प्रामाणिकपणे कष्ट घेतात, पक्ष त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे," असे एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## पासेस मिळत नसतील तर वानखेडे ताब्यात घ्या - आशिष शेलार



**मुंबई :** मुंबईतील ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या भारत विरुद्ध इंग्लंड क्रिकेट सामन्याच्या पासेसवरून आज विधानसभा सभागृहात सत्ताधारी बाकांवरील आमदारांमध्येच खडाजंगी पाहायला मिळाली. "दोन पासेससाठी लोकप्रतिनिधींना मोताद राहावे लागत असेल, तर महसूल विभागाने तांत्रिक फाईल तपासून वानखेडे स्टेडियम तातडीने सरकारच्या ताब्यात घ्यावे," अशी आक्रमक मागणी भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केली. यावर आशिष शेलार यांनी मध्यस्थी करत कायदेशीर कराराची आठवण करून दिली.

टी-२० विश्वचषकातील दुसरा उपांत्य सामना आज भारत आणि इंग्लंड यांच्यात होत आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर या सामन्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा सामना पाहण्यासाठी आपल्याला पासेस मिळावेत, अशी मागणी आमदारांनी आज सभागृहात केली.

भाजप आमदार मुनगंटीवार म्हणाले की, "माझ्याकडे अनेक आमदारांच्या चिठ्ठ्या येत आहेत; आशिष शेलार आमच्या बाजूला बसले होते. बॅरिस्टर वानखेडे यांनी ११ अर्थसंकल्प दिले; त्यांच्या नावाचे स्टेडियम आहे आणि त्या स्टेडियमची तांत्रिक फाईल महसूल खात्यात आहे. सर्वांना वाटते इंग्रजांना हालकताना, इंग्रजांचा पराभव पाहताना आम्ही होतो की नाही माहीत नाही. पण आज इंग्रजांचा पराभव पाहताना साक्षीदार राहावे हाच भाव आमदारांचा असेल, जर आमदारांना दोन पासेससाठीही मोहोताज व्हावे लागणार असेल, तर सरकारने देशभक्तीचा भाव लक्षात घेऊन ज्या आमदारांना रुची आहे, त्यांना ६.३०पर्यंत पासेस द्यावेत. न मिळाल्यास ती फाईलवर सही करून स्टेडियम ताब्यात घ्या," असे त्यांनी सभागृहात घोषित केले.

सुधीर मुनगंटीवारांच्या मागणीला उत्तर देताना आशिष शेलार यांनी सामोपचाराची भूमिका मांडली. ते म्हणाले की, "इंग्लंडचा पराभव व्हावा या भावनेशी मी पूर्ण सहमत आहे. मात्र, वानखेडे स्टेडियम हे राज्य सरकारच्या जागेवर उभे असले, तरी मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA), सार्वजनिक बांधकाम विभाग आणि क्रीडा विभाग यांच्यात एक कायदेशीर करार झालेला आहे. या करारानुसार सरकारला ठराविक कोटा (तिकिटे) दरवेळी दिला जातो."

शेलार पुढे म्हणाले की, "आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम केवळ पासेससाठी काढून घेणे, असे संकेत सभागृहातून जाणे भूषणावह नाही. जर अधिक तिकिटांची गरज असेल, तर कराराचा फेरविचार करता येईल. तसेच स्टेडियमची क्षमता वाढवण्यासाठी एफएसआय (FSI) हवा असल्यास सरकार नक्कीच मदत करेल."

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ मार्च २०२६


## बोलेरो पिकअप पूर्णा नदीपात्रात कोसळल्याने युवकाचा मृत्यू



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : तालुक्यातील येलदरी धरणाजवळून जाणारा रस्ता हा मराठवाडा ते विदर्भाला जोडणारा एकमेव मार्ग आहे परंतू त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.या पुलावरील दोन्ही साईडने कठडे नसल्याने अनेक अपघात होऊन नागरींकाना आपला जिव गमवावा लागला परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग यांची कुंभकर्ण झोप अजून जागी झाली नाही.दिनांक ३ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री एक घटना घडली असून जालना कडून सेनगाव कडे जाणारा बोलेरो पिकप या नदी पात्रात कोसळून ३१ वर्षीय युवकाला आपले प्राण गमवावे लागले अंकूश रामेश्वर शिंदे राहणार सेनगाव असे त्या युवकाचे नाव होते. वाहनावरील ताबा सुटल्याने ते वाहन नदीपात्रात २० ते २५ फूट खाली कोसळले. येलदरी धरणातून पाण्याचा विसर्ग चालू असल्याने नदीमध्ये मोठे पाणी आहे. ही घटना मंगळवारी दिनांक ३ मार्च २०२६ रोजी रात्री घडल्याने बुधवारी सकाळी या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरीकांना पाण्यात वाहन दिसल्यानंतर अपघात उघडकीस आला.याची माहिती नागरिकांनी जिंतूरचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना कळविली त्यानुसार पोलिसांनी क्रेन च्या आधारे वाहन बाहेर काढले व मृत्यू झालेल्या युवकाचे प्रेत बाहेर काढण्यात आले यापूर्वीही वृत्तपत्रात बातम्या प्रकाशित झाल्या होत्या तरी पण सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही दखल घेतली नाही त्यामुळे असे प्रकार वारंवार घडत आहे व नागरिकांचा संताप दिसून येत आहे.

## तोफखाना केंद्रीय विद्यालयात रंगांची उधळण, 'भारत होळी' सोबत एकतेचा संदेश









**नाशिक (प्रतिनिधी) :** शहरातील तोफखाना केंद्रात असलेल्या पीएमश्री केंद्रीय विद्यालय, नाशिक रोड कॅम्प येथे पारंपारिक उत्साह आणि सांस्कृतिक एकतेच्या अनोख्या मिश्रणाने होळीचा सण साजरा करण्यात आला. शाळेत आणि शिक्षक निवास परीसरात आयोजित 'भारत होळी' उत्सवाने भारताचे एक जिवंत चित्र सादर केले, जिथे विविध राज्यांतील शिक्षकांनी रंगांसह आपापल्या संस्कृतीची एकमेकांत देवाण-घेवाण केली.शाळेचे प्राचार्य गजराज मीना यांनी गुलालाचा तिलक लावून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. आपल्या संबोधनात ते म्हणाले, "होळी हा केवळ रंगांचा सण नाही तर 'विविधतेतील एकतेचे' प्रतीक आहे. केंद्रीय विद्यालयात भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेले शिक्षक असतात. त्यांनी एकत्रितपणे साजरी केलेल्या होळीमुळे हा खरोखरच राष्ट्रीय सण बनला आहे." सुरक्षित आणि पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचे आवाहनही मीना यांनी केले.या उत्सवात राजस्थान, उत्तर प्रदेश, हरियाणा, छत्तीसगड, बिहार, गुजरात आणि महाराष्ट्रासह देशभरातील विविध राज्यांतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग होता.या कार्यक्रमात होळीचे पौराणिक महत्त्व, होलिका दहन आणि परस्पर प्रेमाचा संदेश देण्यात आला. होळीच्या गाण्यांच्या सुरात आणि रंगीत गुलालाच्या उधळणीत सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या शेवटी, सात्विक अन्न आणि मिठाई वाटण्यात आली, ज्यामुळे उत्सवाचा गोडवा आणखी वाढला. या कार्यक्रमाने हे सिद्ध केले की रंग जरी वेगवेगळे असले तरी आमच्यातील प्रेम, सौहार्द आणि बंधुत्वाची भावना ही सारखीच आहे!उज्ज्वला चांदोरकर, अमित कुमार शुक्ला, पूजा अग्रवाल, पूजा यादव, आकांक्षा चंद्रा, मनीषा, अंजली सक्सेना, शैलेंद्र यादव, इंदू कुमार सोनबोईर, रोहित गौर, बिरबल यादव, अविनाश पवार, आरेफ बेग, अमृत बागुल, इकबाल पठाण, महादेव इघारे, विनीत कुमावत, प्रमोद वाघळे आदींनी होळी उत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## विद्यापीठाच्या इतिहास विभागामध्ये राजर्षी शाहू व्याख्यानमालेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यार्थी विकास मंडळ व इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाले अंतर्गत दि ०६/०३/२०२६ रोजी दुपारी १२. वा "जातिअंताचा लढा आणि राजर्षी शाहू महाराज" या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील विवेकानंद महाविद्यालयातील इतिहास विभागातील प्रा. डॉ. अरुण वाहुळ पांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सतिश दांडगे (माजी विभागप्रमुख लोकप्रशासन विभाग व माजी अधिसभा सदस्य) उपस्थित राहणार आहे. ही व्याख्यानमाला इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथे होणार आहे. या व्याख्यानला उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजिका डॉ. पुष्पा गायकवाड, सहसंयोजक डॉ. राहुल बचाटे, विभाग प्रमुख डॉ. गीतांजली बोराडे यांनी केली आहे.

## मुरूम शहर पत्रकार संघाकडून महावितरण कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** लाईनमन दिनाचे औचित्य साधून गुरुवारी (ता. 5) रोजी मुरूम शहर पत्रकार संघाकडून महावितरण कर्मचाऱ्यांचा फेटा बांधून शाल, पुष्पहार व टेस्टर भेट देऊन विशेष सत्कार करण्यात आला. ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता आपला जीव धोक्यात घालून वीज सुरळीतपणे चालू राहावे, यासाठी नागरी सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा लाईनमन दिनी सत्कार व्हावा व त्यांच्या पाठीशी नागरिक खंबीरपणे उभे असून त्यांना पाठबळ देण्यासाठी मुरूम शहर पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आल्याचे मत यावेळी संघाचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी सहायक अभियंतासह सर्व महावितरण कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नहिरपाशा मासूलदार, सचिव मोहन जाधव, सहसचिव अंजिक्य मुरूमकर, प्रसिद्धीप्रमुख प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले आदींची उपस्थिती होती.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ मार्च २०२६


## शिवाजी महाविद्यालयात संत तुकाराम महाराजांना अभिवादन!



**कन्नड (अरूण थोरात) :** येथील शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कन्नड येथे मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र, अंतर्गत संत तुकाराम अध्यासन केंद्र यांच्या वतीने विविध उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली केले जाते. संत तुकाराम बीजेनिमित्त संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी संत तुकाराम महाराज यांच्या जीवन व कार्यावर डॉ. रामचंद्र झाडे यांनी प्रकाश टाकला. यावेळी डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ट महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अभय आहेर, मराठी विभाग तथा अध्यासनाचे प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. के. एल. भानुसे यांनी केले तर डॉ. शिवाजी हुसे यांनी आभार मानले.

## इ. १० वी व इ. १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे सुरु

**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्हयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, खेळाडू यांना कळविण्यात येते की, प्रतिवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज मागविले जातात. सन २०२५-२६ मध्ये ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रीया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे. खेळाडू विद्यार्थी / जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार पोर्टलवर URL : https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकद्वारे सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडुन स्विकारला जाणार नाही, जर अशी बाब कार्यालयाच्या निदर्शनास आली तर त्यासंदर्भात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था जबाबदार राहतील.अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे (१) परीक्षा प्रवेशपत्र ( Hall ticket ), (२) प्रपत्र क्रमांक - एक, (३). प्रपत्र क्रमांक - दोन्न, (४) क्रीडा प्रमाणपत्र - अधिकृत क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतलेले प्रमाणपत्र, (५) १२ वी करिता अर्ज करत असल्यास १० वी गुणपत्रक आवश्यक.यापूर्वी अर्ज भरताना फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी करावी लागणारी बाब आता करावी लागणार नाही. ऑनलाईन अर्जा मध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचा परीक्षा बैठक क्रमाक ( Seat Number) नमूद करताच त्यांचा फोटो आणि सिस्टीममध्ये आपोआप (Auto Fetch ) उपलब्ध होईल त्यामुळे तांत्रिक चुका होण्याची शक्यता कमी झाली आहे.इ. १० वी व इ. १२ वी विद्यार्थाचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्या करिता दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत आहे. दि. ३१ मार्च २०२६ रोजी नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची जिल्ह्यातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, खेळाडू विद्यार्थी यांनी नोंद घ्यावी. अधिकच्या माहिती करीता क्रीडा मार्गदर्शक श्री. अविनाश पाटील यांना ९६२३७८११२१ या भ्रमणध्वनि वर संपर्क साधावा असे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर हे कळवितात.

## निस्वार्थपणे राबणारा

बाप असतो नारळासारखा,वरून कडक<br>
संकटांना देत असतो,सर्व शक्तीनिशी धडक.

बापाचे अंतर्मन असते,फणसासारखे गोड.<br>
वागतांना जीवनभर,कडक शिस्तीचे जोड.

बाप असतो कठोर,नेहमीच वागतांना,<br>
कुटुंबासाठी सतत,दिसणार राबतांना.

कुटुंबाच्या सुखासाठी,भोगत असतो दु:ख.<br>
दु:ख सोसुनी सर्वांना,वाटत असतो सुख.

स्वतः मात्र सुखापासून, खूप दूरवर बसतो.<br>
सर्वांना सुखात पाहून,सदा आनंदाने हसतो.

निस्वार्थपणे राबणारा,जगात एकमेव बाप.<br>
आयुष्याच्या संध्याकाळी,बापाला देऊ नये ताप.

बाप असतो जीवनभर,सुखा पासून खूप दूर.<br>
म्हणूनच मित्रांनो,बापाच्या नयनी आणू नये पूर.

बाप थकता सर्वांनी,जिवापाड काळजी घ्यावे.<br>
बापाला उतारवयात,प्रेमाने अलिंगन द्यावे.



**नागेश बोंतेवाड,**<br>
**छत्रपती संभाजीनगर**

## काशीबाई विश्र्वभंरराव बेंडकाळे यांचे निधन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील काशीबाई विश्र्वभंरराव बेंडकाळे वय वर्ष ७० यांचे आज गुरुवार दि. ५ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. ६ रोजी सकाळी १० वा. सार्वजनिक स्मशानभुमी येथे अन्त्यसस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, २ मुली व नातवंडे असा परिवार आहे.त्यांचे पाटील परिवाराच्या अंत्यंत जवळचे संबध होते.त्याच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## आई घरात नसताना

दोन दिवसांसाठी आजीकडे<br>
गेलते बाबा नि आई<br>
जातांना आईच्या प्रचंड सूचना<br>
विचारू नका काही!

मी आणि माझा भाऊ चिंटया<br>
आम्ही दोघे होतो घरी<br>
चिंटयाचे हट्ट पुरवितांना<br>
मेटाकुटीस आले मी भारी

रात्री अकरा वाजेपर्यंत<br>
गृहपाठ खूप केला<br>
सकाळी उठायला मात्र<br>
थोडा उशीरच झाला

लवकर उठ ! अभ्यास कर !<br>
आईचा आवाज नाही आला<br>
आवराआवर करतांना<br>
वेळ निघून गेला

टी व्ही बघण्याच्या नादात<br>
गॅसवरील चहा उतू गेला<br>
बिस्कीट सापडत नसल्याने<br>
चिंटयाने गोंधळ केला

भूक लागली म्हणून<br>
पटकन लावले कुकर<br>
पण शिट्टी लावण्याचा<br>
घाईगडबडीत पडला विसर

पोळी गेली करपून<br>
कच्चा राहिला भात<br>
रागावून चिंटया म्हणाला<br>
आता मी नाही खात

शाळा बुडण्याच्या भीतीने<br>
रडू फुटले मला बाई<br>
घर सांभाळणे कठीण असते<br>
घरात नसताना आई !



**- रवींद्र चालीकवार**<br>
मु.पो.ता.महागाव<br>
जि.यवतमाळ<br>
मो.९०११५५९१०६


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.<br>
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.<br>
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ मार्च २०२६

## मोबाईलवरील वादातून युवकावर लोखंडी अवजाराने हल्ला; जिंतूरमध्ये चौघांविरुद्ध गुन्हा



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** शहरात मोबाईलवरून झालेल्या वादातून एका युवकावर मारहाण करून लोखंडी अवजाराने जखमी केल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हरिओम विजय टोकसे (वय २१, रा. चोंडके हॉस्पिटलजवळ, जिंतूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून शंकर काळे, नागेश राठोड (दोघे रा. गणपती गल्ली, जिंतूर), अभीमन्यु साळवे (रा. राम मंदिर परिसर, जिंतूर) व आशिष घोडके (रा. मठ गल्ली, जिंतूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, दि. १ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजता फिर्यादी आपल्या घरासमोर सार्वजनिक रस्त्यावर उभा असताना आरोपी शंकर काळे याने मोबाईल फोनवर अश्लील भाषेत शिवीगाळ केली. यावेळी फिर्यादीने शिवीगाळ करू नये असे सांगितल्याने आरोपीने इतर साथीदारांना बोलावून घेतले. त्यानंतर आरोपी शंकर काळे हा नागेश राठोड, अभीमन्यु साळवे व आशिष घोडके यांना घेऊन फिर्यादीच्या घरासमोर आला.यावेळी आरोपी शंकर काळे याने नागेश राठोड व अभीमन्यु साळवे* यांना फिर्यादीला मारहाण करण्यास सांगितले. त्यानुसार आरोपी अभीमन्यु साळवे याने फिर्यादीला थपडा व बुक्क्यांनी मारहाण केली. त्याचवेळी आरोपी नागेश राठोड याने हातातील लोखंडी अवजाराने फिर्यादीच्या कंबरेवर वार केल्याने फिर्यादी जखमी झाला. तसेच आरोपी शंकर काळे व आशिष घोडके यांनी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.या प्रकरणी दखलपात्र क्र. १२०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ११८(१), ११५(२), २९६, ३५१(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे* .ही तक्रार पोलीस हवालदार शेख लतीफ (बकल नं. १२३) यांनी नोंदवली असून पुढील तपास पोलीस हवालदार पठाण (बकल नं. ९३८) करीत आहेत. हा गुन्हा ४ मार्च २०२६ रोजी रात्री १०.५१ वाजता दाखल करण्यात आला असून फिर्यादी आज पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

जिंतूर शहरात किरकोळ कारणावरून वाढणाऱ्या भांडणांचे प्रमाण चिंताजनक बनत आहे. मोबाईलवरील वाद थेट घरासमोर येऊन मारहाणीपर्यंत पोहोचत असल्याने कायदा व सुव्यवस्था टिकवण्यासाठी पोलिसांनी अशा घटनांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील रोजगार मेळाव्यात १२४ उमेदवारांनी दिली मुलाखत



**उमरगा :** भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा भारतीय राष्ट्रीय युवक काँग्रेस धाराशिव जिल्हा अध्यक्ष मा. अश्लेश शिवाजीराव मोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय सेंटर ऑफ एक्सेलन्स महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करीअर कट्टा अंतर्गत ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल यांच्या वतीने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या रोजगार मेळाव्यात नामांकित ३५ आस्थापनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यापैकी २३ आस्थापनांसोबत महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलचा सामंजस्य करार झाला. यावेळी १२४ तरुणांनी मुलाखती दिल्या. रोजगार मेळाव्याचे उद्घाटन जिल्हा कौशल्य विकास उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त मा. दत्ता चव्हाण यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले हे होते. यावेळी तरुणांशी संवाद साधताना मा. दत्ता चव्हाण म्हणाले की आपल्याकडे कर्तव्यनिष्ठता असावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कोणतेही कार्य कमी लेखून चालणार नाही. फक्त काम करण्याची जिद्द हीच माणसाला आयुष्यात यशस्वी करू शकते. रोजगार मिळवून जे काम आपल्याला करण्याची संधी मिळेल ते स्वीकारून त्या अस्थापनेमध्ये प्रगती करून पुढे जाण्याचा संदेश त्यांनी यावेळी तरुणांना दिला. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये कोणताही न्यूनगंड न ठेवता आपल्या अंगी असलेले कौशल्य विकसित करून रोजगार मिळवावा तसेच मिळालेल्या रोजगार टिकून ठेवायचा असेल तर आपल्या अंगी तशी कौशल्य निर्माण करावीत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. सूर्यकांत रेवते यांनी केले. यावेळी शिप्लर इंडिया जर्मन एम एन सी पुणे, जया हुंडाई लातूर, परफ्लक्स इंजिन सिस्टम पुणे, श्रीनिवास मॅनपावर प्रा. ली.पुणे, गांधी व्हील उमरगा, कुबोटा ट्रॅक्टर उमरगा, तन्मय मेगा मार्ट, उमरगा अशा नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी मुलाखतीसाठी उपस्थित होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ .विलास इंगळे, डॉ पद्माकर पिटले, उपप्राचार्य जी . एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, प्रभारी प्राध्यापक डॉ. अशोक पदमपल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित कंपन्यांचे प्रतिनिधी आणि परिसरातील सर्व प्राचार्यांचा सन्मान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ .विनोद देवरकर यांनी केले तर प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. वसंत हिस्सल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## मुरूम शहर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी डॉ. रामलिंग पुराणे, उपाध्यक्ष नहिरपाशा मासुलदार तर सचिव मोहन जाधव यांची फेरनिवड



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम शहर पत्रकार संघाची गुरुवार (ता. ५) रोजी बसव भवन येथील महात्मा बसवेश्वर वाचनालयाच्या सभागृहात बैठक पार पडली. यावेळी वर्षभरात समाज उपयोगी उपक्रम घेण्याचे ठरले. या बैठकीत मुरूम शहर पत्रकार संघाची एकमताने कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. सन २०२५ च्या कार्यकारणीला सन २०२६ साठी सर्वानुमते पुन्हा फेर निवड करण्यात आली. मुरूम शहर पत्रकार संघटना अध्यक्षपदी डॉ. रामलिंग पुराणे, उपाध्यक्ष नहिरपाशा मासुलदार, सचिव मोहन जाधव, सहसचिव अजिंक्य मुरूमकर, सल्लागार तथा मार्गदर्शक प्रा. डॉ. महेश मोटे, रफिक पटेल, राजेंद्र कारभारी तर प्रसिद्धीप्रमुख प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले, राजेंद्र घोडके, बालाजी व्हनाजे, जगदीश सुरवसे, हुसेन नुरसे, इम्रान सय्यद, विशाल देशमुख, नामदेव भोसले, छायाचित्रकार संकेत इंगोले, अमित ढाले आदीसह पत्रकार बांधव उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ मार्च २०२६

# बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय येथे नुकतेच राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी डॉ.सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्र. प्राचार्य डॉ.भूषण नाफडे आणि डॉ. कविता प्राचार्य यांच्या हस्ते विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन, मॉडेल सादरीकरण, पोस्टर प्रेझेंटेशन आणि व्हिडिओ सादरीकरण यासह विविध प्रकारांमध्ये सहभाग घेऊन आपले बौद्धिक सादर केले. या स्पर्धेत एकूण ५३ विद्यार्थी गटांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी १७ पोस्टर प्रेझेंटेशन, १८ पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन, ११ मॉडेल सादरीकरण आणि ७ व्हिडिओ सादरीकरणांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयक विविध संकल्पना नाविन्यपूर्ण आणि प्रभावी पद्धतीने मांडत आपली संशोधनवृत्ती व सर्जनशीलता सादर केली. यामध्ये विविध क्षेत्रात ए.आय. चा उपयोग याबरोबरच रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, सुक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र, गणित इ. विषयांवर सादरीकरण केले.स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. संदीप पाटील, प्रा.डॉ.बळीराम कटारे, डॉ. रामेश्वर मस्के, प्रा. वर्षा वानखेडे, प्रा. वैशाली शिंदे आणि प्रा. राहुल वाकडे यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. रविंद्र शिंपी, डॉ. निलेश बर्डे, डॉ सुरेश कागणे, डॉ. सुनीता भराडे, प्रा. काझी सायरा, डॉ. प्रेरणा रामटेके, प्रा. कांचन कायंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच भीमराव मोरे, रवी काळे आणि संदीप गुरंप यांनीही मोलाची मदत केली. डॉ. भूषण नाफडे आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. कल्याण कुंभार यांच्या हस्ते गुणवंत विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. मॉडेल सादरीकरणांमध्ये विश्वकर्मा अभी यांना प्रथम तर सुशांत सिंग यांना द्वितीय पारितोषिक मिळाले, पोस्टर प्रेझेंटेशन मध्ये अर्णव दिवे यांना प्रथम, रूपाली आणि सिद्धी यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले, पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनमध्ये अर्णव दिवे आणि यांना प्रथम तर वैष्णवी एखंडे आणि कुणाल काळे यांना द्वितीय पारितोषिक मिळाले, व्हिडिओ सादरीकरण अंतर्गत यशराज बायस यांना प्रथम तर रूपाली आणि श्रेया यांना द्वितीय पारितोषिक मिळाले.विज्ञान दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, संशोधनाची आवड आणि सृजनशीलतेला चालना मिळाली. महाविद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# सीमेवर कर्तव्य,मैदानात पराक्रम, पवन बबनराव जायभाये यांचा राष्ट्रीय विजय





**बुलढाणा (महेश मुंढे) :** जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील रोहणा गावचे सुपुत्र पवन बबनराव जायभाये यांनी घोडेस्वारी ( ईक्वेस्ट्रीयन ) या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे, सीमेवर देश सेवा बजावत असतानाही क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करून त्यांनी तरुणांसमोर आदर्श उभा केला आहे. सध्या पवन जायभाये हे बॉर्डर सिक्युरिटी फोर्स ( BSF ) मध्ये कार्यरत असून ग्वाल्हेर येथील बीएसएफ अकॅडमी देशसेवेचे कर्तव्य बजावत आहेत देश रक्षणाची जबाबदारी सांभाळून त्यांनी घोडेस्वारी या क्रीडा प्रकारात सराव करून राष्ट्रीय स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवले ऑल इंडिया घोडेस्वारी स्पर्धांमध्ये पवन जायभाये यांनी आतापर्यंत तीन सुवर्ण,सात रोप्य, चार कांस्य अशी एकूण १४ पदके जिंकून आपली क्षमता सिद्ध केली आहे. विशेषतः क्रॉस कंट्री या प्रकारात उत्कृष्ट नियंत्रण,संतुलित स्वारी आणि आत्मविश्वास पूर्ण खेळाच्या जोरावर त्यांनी सुवर्णपदक पटकावले. बीएसएफ मध्ये दाखल झाल्यानंतर त्यांनी शिस्त, जिद्द आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर स्वतःचा प्रेरणादायी प्रवास घडवला. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातून आलेल्या पवन यांनी मर्यादित साधनसामग्री असूनही कधीही हार न मानता राष्ट्रीय पातळीवर झेप घेतली, पवन जायभाये यांच्या यशामुळे रोहणा गावासह देऊळगाव राजा तालुका आणि संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे, ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी व सामाजिक संस्थांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# श्रीकृष्ण महाविद्यालयात आज राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर आणि श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी यांच्या संयुक्त विद्यमाने व प्राणीशास्त्र ,वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने "शाश्वत विकासासाठी जैविक विज्ञानातील अलीकडील कल "(RECENT TRENDS IN BIOLOGICAL SCIENCE S FOR SUSTAINABLE DEVELOPMENT-२०२६) या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दि. 06/03/2026 ते 07/03/2026 या दोन दिवसांपैकी पहिला एक दिवस ऑनलाइन चर्चासत्र पार पडणार असून दुसऱ्या दिवशी ऑफलाईन चर्चासत्र संपन्न होणार आहे.या परिसंवादाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. अरविंद धाबे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथील प्रा. अरुण खरात हे राहणार आहेत.तर स्वागताध्यक्ष म्हणून श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे राहणार आहेत.पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून गुलबर्गा विद्यापीठ, कलबुर्गी येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख जी. एम. विद्यासागर हे राहणार आहेत. त्याचबरोबर वाडिया कॉलेज पुणे येथील सी. जे. हिवरे, कलबुर्गी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. के. विजयकुमार यांचेही जैविक विज्ञानाशी संलग्नित विविध विषयावर व्याख्यान होणार आहे. विज्ञान आणि प्रगती यांची सांगड घातली तरच शाश्वत विकासाची चिरंतनता आपल्याला अधोरेखित करता येते खरे पाहिले तर जैविक विज्ञान हे अनेक कार्यक्षेत्रांच्या केंद्रस्थानी आहे ते अनेक क्षेत्रांशी निगडित आहे आजच्या शतकातील शेती, शेतीपूरक व्यवसाय आरोग्य हवामानातील बदल अन्नसुरक्षा पर्यावरणाचा ऱ्हास यासारख्या आपल्याला कायम भेडसावणाऱ्या समस्यासाठी उपयुक्त ठरू शकते किंबहुना ते उपयुक्त आहे. असेच म्हणावे लागेल जागतिक आरोग्य आणि दर्जेदार जीवनशैली यासाठी अनेक नवनवीन उपयुक्त संशोधनातून संपन्न जीवनाच्या अज्ञात कक्षा त्यामुळे उघडल्या जाऊ शकतात. जैविक विज्ञानाच्या क्षेत्रात अलीकडच्या काळात झालेल्या नवनवीन संशोधन व शैलीतून झालेल्या प्रगतीशी सुसंगत राहून मानवी चिरंतन विकासासाठी जैविक विज्ञानातील अलीकडील ट्रेंड्स २०२६ या विषयावर जाणीवपूर्वक परिसंवादाचे आयोजन करण्यात आलेली आहे .त्यामुळे या परिसंवादात जास्तीत जास्त प्राध्यापक, संशोधक आणि संशोधक विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवावा असे आव्हान संयोजन समितीचे डॉ. दस्तगीर पठाण (९४२३७४०७५५) व प्राचार्य डॉ. गुलाब राठोड (९८३४५१५०५५) यांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ मार्च २०२६



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## कष्टकरी हात

करताना काम! जरी चुक छोटी!
शिक्षा रोज मोठी! ठरलेली!!

इतभर पोट! काय त्याचा थाट!
आयुष्याची वाट! लागलेली!!

रोजचे फटके! उन्हाचे चटके!
हसणे लटके! नाटकीच!!

दगडाचा देव! किती त्याला भाव!
माणसाचा गाव! कुठं आता!!

आयुष्य सांडता! अश्रू ओघळले!
कडे ओलावले! पापणीचे!!

रक्ताच्या घामात! भिजलय रान!
हरवले भान! जगण्याचे!!

मुक्या वेदनांची! मुकीच कहाणी!
कुठं आता गाणी! आनंदाची!!

कष्टकरी हात! जगाचा आधार!
त्याच्यावर वार! नियतीचे!!



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

# जिल्ह्यात महिला दिनापासून HPV लसीकरण मोहीम, पात्र मुलींना मोफत दिली जाणार आरोग्यदायी लस



**बीड (भगवंत पाळवदे) :** महिला व मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या एचपीव्ही (HPV) लसीकरण मोहिमेचा बीड जिल्ह्यात 8 मार्चपासून शुभारंभ होणार आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील पात्र मुलींना मोफत लस देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.या मोहिमेच्या तयारीसाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत लसीकरण मोहिमेचे नियोजन, मानव संसाधन, कोल्ड चेन व्यवस्था आणि जनजागृती कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला.गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी एचपीव्ही लस अत्यंत प्रभावी मानली जाते. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या (ICMR-NCRP, २०२२) अहवालानुसार भारतात दरवर्षी मोठ्या प्रमाणात महिलांना या कर्करोगाचा सामना करावा लागतो. २०२२ मध्ये भारतात 79103 नवे रुग्ण आढळून आले. 34805 रुग्णांचा मृत्यू गर्भाशयमुख कर्करोगामुळे झाल्याचा अंदाज आहे.त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एचपीव्ही लसीकरण महत्त्वाचे ठरते.या मोहिमेत गार्डसिल-4 (Gardasil-४) ही लस देण्यात येणार असून ती HPV चे 6, 11, 16 आणि 18 या प्रकारांपासून संरक्षण देते. ही लस सुरक्षित व प्रभावी असून पात्र मुलींना मोफत देण्यात येणार आहे.जिल्ह्यात 14 वर्षे पूर्ण झालेल्या मुलींना ही लस देण्यात येणार असून जिल्ह्यात सुमारे 22,253 मुलींचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे. लसीकरणासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालय तसेच काही शैक्षणिक संस्थांमध्ये व्यवस्था करण्यात येणार आहे.लसीकरण मोहिमेत आरोग्य सेविका, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका तसेच आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचा सहभाग राहणार आहे. कोल्ड चेन, यू-विन (U-WIN) डिजिटल नोंदणी प्रणाली तसेच लॉजिस्टिक व्यवस्था जिल्हा प्रशासनाने पूर्ण केली आहे.जिल्हा प्रशासनाने सर्व पालक व नागरिकांना आवाहन केले आहे की, पात्र मुलींनी एचपीव्ही लस घेऊन गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळवावे आणि या महत्त्वाच्या सार्वजनिक आरोग्य मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी /१२ वी पास

SANITARY HEALTH INSPECTOR
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी /१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : Any B.Sc.

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc
(Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी, १२ वी पास

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

DIALYSIS TECHNICIAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी / १२ वी पास

O.T.TECHINICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास



ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903